**महत्वाचे / काल मर्यादा**


अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम
दुरध्वनी क्रमांक- ०२४२६ २४३२१५
इ-मेल-
dracdmpkv2013@rediffmail.com

महाराष्ट्र शासन
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**
**कार्यालय-** उपकुलसचिव (विद्या)

**पत्ता-**
प्रशासकीय इमारत, मध्यवर्ती परीसर,
मफुकृवि, राहुरी. ता. राहुरी. जि.
अहमदनगर महाराष्ट्र पिन- ४१३७२२.


जा.क्र./विद्या-१०/शिष्यवृत्ती /2668 /२०२१ दिनांक- 20 /०९/२०२१.

प्रति,

१. मा. सहयोगी अधिष्ठाता,
पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी, पुणे, धुळे, कोल्हापूर.
कृषि महाविद्यालय पुणे /धुळे/कोल्हापूर/नंदूरबार/कराड/डॉ. आ.शि.कृ.अ. महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी.

२. प्रकल्प अधिकारी,
कृषि महाविद्यालय मुक्ताईनगर /हाळगाव/कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मालेगाव

३. प्राचार्य
सर्व कृषि व सलग्न विनाअनुदानीत महाविद्यालये.

**विषय :** **केंद्र शासनाच्या सामाजिक न्याव व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ च्या अंमलबजावणी बाबत..**

संदर्भ : १. मकृशि व सं.प. यांचे पत्र क्रमांक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१७८२/२०२१ दि. १५/०९/२०२१ चे पत्र.
२. क्र.उशि.सं.-/शिष्यवृत्ती/दिव्यांगजन/२०२१-२२/१००४७ दि.०८/०९/२०२१ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे. त्या अनुषंगाने केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक सुचना महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावून त्याबाबत विद्यार्थ्यांस अवगत करावे.

तरी सन २०२०-२०२१ मध्ये केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना होणे करीता त्यांना वैयक्तिकपणे अवगत करावे जेणे करुन विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही.

संदर्भिय पत्र माहितीसाठी सहपत्रित केले आहे. धन्यवाद.

आपला विश्वासू,

20/9/2021

उपकुलसचिव (विद्या)

सोबत : वरीलप्रमाणे.

Scanned with CamScanner

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

MCAER कृषि परिषद

ई-मेल : ednmcaer@gmail.com

दूरध्वनी (०२०) २५५२८६८८

जा.क्र.मकृप/शिक्षण-१/१७८२/२०२१

दिनांक : १५/०९/२०२१

प्रति,

कुलसचिव,
सर्व कृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ च्या अंमलबजावणी बाबत**

**संदर्भ :-** शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/दिव्यांगजन/२०२१-२२/१००४७, दि.०८.०९.२०२१

Pl. put up circular

उपरोक्त संदर्भीय पत्राचे आवलोकन व्हावे. त्या अनुषंगाने कृषि विद्यापीठांतील केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक सुचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना/विद्यालयांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात अशी विनंती आहे.

संदर्भिय पत्र माहीतीसाठी सहपत्रित केले आहे.

17/9/2021

सोबत :- वरीलप्रमाणे.

(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रत माहितीस्तव :-

१. **मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. **सहसचिव (कृषि विद्यापीठे)**, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. **अधिष्ठाता, (कृषि)** सर्व कृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

ACD 32 17/9

Academic Department M.P.K.V. Rahuri — 17 SEP 2021

| | |
|---|---|
| Dy. Reg. | |
| A. Reg. | |
| B.O.S. | |
| Inward No. | 237 |

REGISTRAR'S OFFICE M.P.K.V., RAHURI
PAR 4159
Dt. 17/9/21

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

महा राष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं-/शिष्य/ दिव्यांगजन/२०२१-२२ /१००८७ दिनांक- ०८.०९.२०२१

8 SEP 2021

परिपत्रक

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार ,नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ च्या अंमलबजावणी बाबत.**

**संदर्भ :** केंद्रशासनाचे पत्र क्र.D-१२०११/०१/२०२१-DBT दि.१७.०८.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने **दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना** राबविण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh)आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एनएसपी पोर्टल वरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११वी, १२वी पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा / सर्टिफिकेट पदवी , पदव्युत्तर डीग्री /डिप्लोमा तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १०वी, व १२वी ची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

❖ **नविन मंजूरी आणि नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३०/११/२०२१ ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५.१२.२०२१ ही आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांनी आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार क्रमांक नसेल तर त्याऐवजी आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

५. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

६. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

७. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

❖ विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-

१. NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयानी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबत प्रक्रीयाचे सविस्तर माहिती www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

२. विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत.

३. महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

Scanned with CamScanner

उपरोक्त सूचना आपल्या विभागामधील सर्व कनिष्ठ महाविद्यालये, डिप्लोमा महाविद्यालये व उच्च शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठास यांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोळी संचालनालयास सादर करावा.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत-

१.मा.प्रधान सचिव ,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन ,मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned with CamScanner